• वर्ष : ०३ • अंक : २५६ • पुणे • रविवार, दि. ०७ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

रविवार दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





## थोडक्यात पण महत्वाचे



### खरीप हंगामासाठी जुन्नर तालुका खरेदी विक्री संघाकडे बियाणे उपलब्ध

जुन्नर (आरंभ पर्व) : खरीप हंगामासाठीजुन्नर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाच्या वतीने शेतकऱ्यांना आवश्यक असणारे विविध प्रकारचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले असून शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संघाचे अध्यक्ष सुधीर लाड व उपाध्यक्ष दिपक कोकणे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडील दर्जेदार इंद्रायणी,भोगावती हे भात बियाणे तसेच फुले किमया केडीएस ७५३ व फुले संगम केडीएस ७२६ तसेच फुले दुर्वा केडीएस ९९२ सोयाबीन बियाणे संघाच्या जुन्नर, नारायणगाव व ओतूर डेपो येथे उपलब्ध झाले आहे. खरेदी विक्री संघात पुरेसा बियाणे साठा उपलब्ध असून सर्व प्रकारची रासायनिक व मिश्र खते देखील विक्रीस उपलब्ध आहे. खरेदी-विक्री संघाचे मार्गदर्शक ॲड. संजय काळे यांच्या सूचनेनुसार संचालक मंडळाने नामांकित कंपन्यांची सर्व प्रकारची रासायनिक खते, बी-बियाणे संघातून खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. बनावट किंवा भेसळयुक्त बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच प्रमाणित बियाणे खरेदी करावे आणि पावती जपून ठेवावी. कृषी विभागाच्या राष्ट्रीय खाद्य तेल अभियाना अंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना वाटपासाठी शंभर टक्के अनुदानावर बियाणे संघाकडे उपलब्ध झालेले आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या जुन्नर,ओतूर, नारायणगाव डेपोकडून वितरण व्यवस्था केली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी महाबीजमार्फत पुरवठा करण्यात येणारे बियाणे ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाण्यासाठी डीबीटी ऑनलाइन पोर्टलवर अर्ज केले आहेत. त्यांची लॉटरी पद्धतीने निवड केली त्या सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन केडीएस ९९२(फुले दुर्वा ) बियाणे मोफत दिले जाणार आहे.




### एसएसआय मंत्रा रोबोटिक सिस्टिमचा विश्वविक्रम

पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा संपूर्ण जगाला थक्क केले आहे. प्रख्यात हृदय शल्यचिकित्सक डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये बसून भारतातील इंदूर येथे असलेल्या रुग्णाच्या हृदयावर यशस्वी रोबोटिक टेली-सर्जरी करून वैद्यकीय इतिहासात नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. सुमारे २०,००० किलोमीटर अंतरावरून करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया जगातील आतापर्यंतची सर्वात लांब अंतरावरील रोबोट-सहाय्यित हृदय टेली-सर्जरी मानली जात आहे. ही ऐतिहासिक प्रक्रिया गयानातील जॉर्जटाउन पब्लिक हॉस्पिटल कॉर्पोरेशन (GPHC) आणि भारतातील IRCAD इंडिया, इंदूर यांच्यामध्ये यशस्वीपणे पार पडली. या यशाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आलेल्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम च्या सहाय्याने करण्यात आली.

### २४ तास सुरू राहणार दुकाने व आस्थापने; पाठपुराव्याला मोठे यश



पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी - पुणे शहरचे अध्यक्ष महेश गुप्ता यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, पुणे शहरातील व्यापारी वर्गाच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होणार आहे. यासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व्यापारी संघटनांची विशेष समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, महेश गुप्ता तसेच विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत दुकाने व आस्थापनांच्या वेळांबाबत निर्माण झालेला संभ्रम, शहरातील विविध भागांमध्ये नियमांची होत असलेली वेगवेगळी अंमलबजावणी, व्यापाऱ्यांशी सन्मानपूर्वक वर्तन तसेच व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, सर्व अधिकृत व परवानाधारक दुकाने आणि आस्थापने यांना कायद्यानुसार २४ तास व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी आहे. तसेच टपऱ्या, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले, पानटपऱ्या आणि तत्सम व्यवसायांना रात्री १० वाजेपर्यंत व्यवसाय करण्यास परवानगी असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पष्टीकरणामुळे व्यापारी वर्गातील संभ्रम दूर झाला असून, नियमांबाबत अधिक स्पष्टता निर्माण झाली आहे.

# समाजसेवेचा वसा जपणारे युवा नेतृत्व

## रुपेश आबासाहेब घुले पाटील

**"जीवेत शरदः शतम्" या शुभाशयांसह ७ जून रोजी वाढदिवस साजरा करणारे युवा नेतृत्व आदरणीय रुपेश आबासाहेब घुले पाटील हे आज सामाजिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी क्षेत्रात एक विश्वासार्ह नाव बनले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, संवेदनशीलता आणि लोकांप्रती असलेली आत्मीयता यामुळे ते सर्वसामान्यांच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत.**

### वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

• शब्दांकन : हेमेंद्र जोशी •
नांदेड सिटी, पुणे
8275395772

**(दै. आरंभ पर्व)**

सन २०१५ मध्ये नांदेड सिटी परिसरात सामाजिक कार्याची सुरुवात झाल्यानंतर रुपेशजींचा परिचय झाला. संघकार्याची निष्ठा, समाजहिताची तळमळ आणि लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध जपण्याची त्यांची वृत्ती पहिल्याच भेटीत जाणवली. शांत, संयमी आणि अभ्यासू स्वभावामुळे त्यांनी अल्पावधीतच समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

रुपेशजींनी अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, विद्यार्थ्यांना मदत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रम तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवून त्यांनी समाजातील विविध घटकांना जोडण्याचे कार्य केले आहे.


कोरोना महामारीच्या काळात त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. कुटुंबातील पाच ज्येष्ठ व्यक्तींचे निधन झाले, तरीही या संकटावर मात करत त्यांनी समाजसेवेचा ध्यास अधिक जोमाने कायम ठेवला. आपल्या पूज्य मातोश्रींच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या "निर्मला घुले प्रतिष्ठान"च्या माध्यमातून त्यांनी ॲम्ब्युलन्स सेवा, आरोग्य शिबिरे, वैद्यकीय मदत आणि अनेक जनकल्याणकारी उपक्रम सुरू केले.

दरवर्षी शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणारे भव्य रक्तदान शिबिर हा त्यांचा विशेष उपक्रम आहे. रक्तदात्यांचा सन्मान करून समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. तसेच साहित्य, संगीत आणि कला क्षेत्रातील कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी साहित्य, संगीत व कला समितीची स्थापना करून त्यांनी सांस्कृतिक चळवळीला नवे बळ दिले आहे.

महिला सक्षमीकरणासाठी जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करून त्यांनी नारीशक्तीप्रती असलेला आदर व्यक्त केला आहे. संघकार्यामध्येही त्यांनी समर्पितपणे योगदान दिले असून समाजहिताला नेहमीच प्राधान्य दिले आहे. विशेष म्हणजे त्यांच्या या सामाजिक प्रवासात त्यांच्या धर्मपत्नी सौ. रश्मी घुले पाटील तसेच चि. वेदांत आणि साहिल यांचाही सक्रिय सहभाग आहे. कुटुंबासह समाजकार्य करण्याचा त्यांचा आदर्श अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

अशा या बहुआयामी, कर्तृत्ववान आणि लोकाभिमुख नेतृत्वाचा वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा क्षण नसून समाजसेवेच्या प्रवासाचा गौरव करण्याचा दिवस आहे. त्यांच्या हातून भविष्यातही अशीच निरपेक्ष समाजसेवा घडत राहो, उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यश त्यांच्या वाट्याला येवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**जीवेत शरदः शतम्!**
**आदरणीय रुपेश आबासाहेब घुले पाटील यांना वाढ दिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**



# शाओमी 17T भारतात दाखल



### प्रीमियम छायाचित्रण आणि दमदार बॅटरीची जोड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाओमी इंडियाने लायका सह-विकसित प्रगत कॅमेरा तंत्रज्ञान, आकर्षक रचना आणि दमदार बॅटरी क्षमतेसह नवीन शाओमी 17T स्मार्टफोन भारतीय बाजारपेठेत सादर केला आहे. प्रगत छायाचित्रण, उत्कृष्ट दृश्य अनुभव, उच्च कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी यांचा समतोल साधणारा हा स्मार्टफोन प्रीमियम श्रेणीतील ग्राहकांसाठी विकसित करण्यात आला आहे. शाओमी 17T मध्ये लायका समर्थित ट्रिकॅमेरा प्रणाली देण्यात आली असून त्यात ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा आणि टी मालिकेत प्रथमच ५ पट पेरिस्कोप दूरदृश्य कॅमेरा समाविष्ट करण्यात आला आहे. यामुळे जवळील सूक्ष्म तपशीलांसह दूरवरील दृश्येही स्पष्टपणे टिपता येणार आहेत.

कंपनीने या स्मार्टफोनमध्ये 'लायका लाइव्ह मोमेंट' हे नवे वैशिष्ट्य दिले आहे. यामुळे केवळ एखादा क्षण टिपण्याऐवजी त्या क्षणातील हालचाल, भावना आणि वातावरणही जतन करता येते. तसेच 'लायका लाइव्ह पोर्ट्रेट' सुविधेमुळे अधिक नैसर्गिक आणि चित्रपटसृष्टीतील दृश्यांसारखी छायाचित्रे टिपण्याचा अनुभव मिळणार आहे. शाओमी 17T मध्ये ६.५९ इंच आकाराचा १.५ के ॲमोलेड पडदा देण्यात आला असून त्याची कमाल प्रकाशमानता ३५०० निट्स आहे. १२० हर्ट्झ रीफ्रेश दरामुळे सहज स्क्रोलिंग, खेळ आणि दृश्य अनुभव मिळतो. 'शाओमी व्हिजन केअर' प्रणालीमुळे निळ्या प्रकाशाचा प्रभाव कमी होऊन डोळ्यांवरील ताण कमी करण्यास मदत होते. या सुविधेसाठी या उपकरणाला आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रेही मिळाली आहेत. या स्मार्टफोनमध्ये ६५०० एमएएच क्षमतेची सिलिकॉन-कार्बन बॅटरी देण्यात आली आहे. ६७ वॅट वेगवान चार्जिंग सुविधेमुळे कमी वेळात बॅटरी चार्ज होण्यास मदत मिळते. काम, मनोरंजन, प्रवास आणि दैनंदिन वापरासाठी अखंड कार्यक्षमता देण्याचा कंपनीचा दावा आहे. शाओमी हायपरओएस, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुविधा, प्रगत शीतकरण तंत्रज्ञान आणि गुगलच्या विविध सेवांच्या मदतीने हा स्मार्टफोन अधिक स्मार्ट आणि वापरण्यास सुलभ बनविण्यात आला आहे.

पातळ आणि हलक्या रचनेतील हा स्मार्टफोन जांभळा, निळा आणि काळा रंग पर्यायांमध्ये उपलब्ध असून आधुनिक डिझाइन आणि प्रीमियम दर्जाची निर्मिती यांचा संगम त्यात पाहायला मिळतो. शाओमी 17T हा १२ जीबी रॅम + २५६ जीबी संचयन आणि १२ जीबी रॅम + ५१२ जीबी संचयन अशा दोन प्रकारांमध्ये उपलब्ध होणार आहे.

# स्टारबक्स : एका कॉफी ब्रँडची जागतिक यशोगाथा

**(दै. आरंभ पर्व)**




आजच्या आधुनिक जीवनशैलीत कॉफी हे केवळ पेय राहिलेले नाही, तर ती एक संस्कृती बनली आहे. या कॉफी संस्कृतीला जागतिक स्तरावर लोकप्रिय बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा ब्रँड म्हणजे स्टारबक्स. जगातील सर्वात मोठ्या कॉफीहाऊस साखळ्यांपैकी एक असलेल्या स्टारबक्सने आपल्या दर्जेदार कॉफी, आकर्षक वातावरण आणि ग्राहककेंद्री सेवेमुळे एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्टारबक्सची स्थापना १९७१ मध्ये अमेरिकेतील सिएटल शहरात झाली. सुरुवातीला कंपनी केवळ कॉफी बियाणे आणि उपकरणे विकत होती. मात्र, १९८७ मध्ये हॉवर्ड शुल्ट्झ यांनी कंपनीची धुरा स्वीकारल्यानंतर स्टारबक्सने कॉफीहाऊस व्यवसायात प्रवेश केला आणि त्यानंतर कंपनीच्या वाढीचा वेग झपाट्याने वाढला.

स्टारबक्सची खासियत म्हणजे ग्राहकांना केवळ कॉफी विकणे नव्हे, तर त्यांना एक वेगळा अनुभव देणे. आरामदायी वातावरण, मोफत वाय-फाय, शांत संगीत आणि विविध प्रकारच्या कॉफीमुळे स्टारबक्सची केंद्रे तरुणाई, व्यावसायिक आणि कॉफीप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र बनली आहेत.

कंपनीच्या मेनूमध्ये एस्प्रेसो, कॅपुचिनो, लाटे, अमेरिकानो, फ्रॅपुचिनो यांसारख्या विविध कॉफी प्रकारांसह चहा, स्नॅक्स, सँडविच आणि बेकरी पदार्थांचाही समावेश आहे. ग्राहकांच्या आवडीनुसार पेयांमध्ये बदल करण्याची सुविधा हेही स्टारबक्सचे एक मोठे वैशिष्ट्य आहे.

भारतामध्ये स्टारबक्सने २०१२ मध्ये प्रवेश केला. स्टारबक्स इंडिया आणि टाटा कंझ्युमर प्रोडक्टस यांच्या संयुक्त उपक्रमातून भारतातील स्टारबक्स स्टोअर्सचे संचालन केले जाते. मुंबईपासून सुरू झालेला हा प्रवास आज देशातील अनेक प्रमुख शहरांपर्यंत पोहोचला आहे.

स्टारबक्स पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीवरही भर देते. शाश्वत शेती, पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर आणि कॉफी उत्पादक शेतकऱ्यांना मदत अशा विविध उपक्रमांद्वारे कंपनी आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करते.

जागतिक स्तरावर हजारो स्टोअर्स आणि लाखो ग्राहकांच्या विश्वासामुळे स्टारबक्स हा केवळ कॉफी ब्रँड नसून एक जीवनशैलीचे प्रतीक बनला आहे. गुणवत्ता, नावीन्य आणि ग्राहक अनुभव यांवर आधारित व्यवसाय मॉडेलमुळे स्टारबक्सने जागतिक बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

# राज्यपाल यांची जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रमास उपस्थिती

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**




### पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक कृतीचे आवाहन

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त वांद्रे येथील कार्टर रोड खुल्या रंगमंचावर आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. 'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात भामला प्रतिष्ठानचे अध्यक्ष आसिफ भामला यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

हवामान बदलाबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या देशव्यापी मोहिमेचे तसेच विशेष पर्यावरण गीताचे अनावरण करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'पर्यावरण नेतृत्व पुरस्कार' प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, गायक शंकर महादेवन, अभिनेते राघव जुयाल, वेशभूषाकार मनीष मल्होत्रा, आध्यात्मिक मार्गदर्शक गौर गोपाल दास, गायक टोनी कक्कर, अभिनेते अर्जुन बिजलानी, अभिनेत्री मन्नारा चोप्रा यांच्यासह सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आसिफ भामला म्हणाले, "जागतिक पर्यावरण दिन ही केवळ दिनदर्शिकेतील तारीख नसून पृथ्वीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि पर्यावरणपूरक कृती करण्याची संधी आहे. 'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणीय जबाबदारी दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे."

भामला प्रतिष्ठानने वृक्षारोपण, शहरी वनसंवर्धन, समुद्रकिनारा स्वच्छता, खारफुटी संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती मोहिमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या माहितीनुसार, आतापर्यंत ५० हजारांहून अधिक वृक्ष लागवड, ५५० हून अधिक समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम, ८०० पेक्षा अधिक संस्थांचा सहभाग आणि ३० हजारांहून अधिक पर्यावरण रक्षकांचे जाळे उभारण्यात आले आहे. सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्यगीत, स्वागत समारंभ, पर्यावरण नेतृत्व पुरस्कार वितरण तसेच पर्यावरणविषयक विविध मोहिमांचा प्रारंभ करण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# बाबाजी शिरसाठ यांची आत्मा सदस्यपदी नेमणूक

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**



जुन्नर तालुका सहकारी खरेदी विक्री संघांचे बाबाजी चिमाजी शिरसाठ यांची जुन्नर तालुका आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा)शेतकरी सल्लागार समितीवर अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. आत्मा नियामक मंडळ पुणे चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मान्यतेने ही निवड करण्यात आली आहे शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे आणि शासनाच्या विविध योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचे काम तालुका खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून शिरसाठ करत आहेत. त्यांनी शासनाच्या विविध योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोचविल्या आहेत. यात अनुदानावर सोयाबीन बियाणे, भात बियाणे हरभरा बियाणे गहू बियाणे ज्वारी बियाणे इत्यादी तालुका कृषी कार्यालयाच्या मार्गदर्शनाने शासनाच्या सर्व योजना खरेदी विक्री संघाच्या मार्फत राबविण्यात आल्या आहेत. शिरसाठ यांना यापूर्वीही पुणे जिल्ह्यात उत्कृष्ट काम केल्या बद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०१९ मध्ये अटल महापणन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

# बिगर शेती परवान्याच्या कामात ३५ लाखांची फसवणूक; बनावट कागदपत्रांचा आरोप, वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील केसनंद येथील शेतकरी बाबासाहेब तुकाराम हरगुडे यांनी बिगर शेती (एन.ए.) परवाना मिळवून देण्याच्या नावाखाली तब्बल ३५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार वाघोली पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. संबंधित प्रकरणात बनावट कागदपत्रांचा वापर करून शासकीय यंत्रणेची दिशाभूल केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तक्रारदार बाबासाहेब हरगुडे यांच्या म्हणण्यानुसार, मौजे केसनंद (ता. हवेली, जि. पुणे) येथील गट क्रमांक १७२ मधील जमीन बिगर शेती करण्यासाठी तसेच आवश्यक शासकीय मंजुरी, ना-हरकत दाखले आणि इतर परवानग्या मिळविण्याचे काम सुरुवातीला आर्किटेक्ट अमित आव्हाळे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यानंतर अरुण दत्तात्रय गायकवाड यांनी संपर्क साधून परिसरातील अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचा दावा करत संबंधित काम स्वतःकडे घेतले. गायकवाड यांनी सदर प्रकरण अंतिम टप्प्यात असून फाईल पीएमआरडीए कार्यालयात विचाराधीन असल्याचे सांगून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला. तक्रारदार शेती व दुग्ध व्यवसायात व्यस्त असल्याने त्यांनी संपूर्ण प्रक्रिया गायकवाड यांच्याकडे सोपविली. त्यानुसार वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे पैसे देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, संबंधित कागदपत्रे अरुण गायकवाड यांनी स्वतःच्या नावाने अर्ज करून केसनंद येथील गाव कामगार तलाठी शुभम वाबळे यांच्याकडे पडताळणीसाठी सादर केली होती. कागदपत्रांची तपासणी करताना गंभीर त्रुटी व संशयास्पद बाबी आढळल्याने हे प्रकरण पुढील चौकशीसाठी अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्याकडे पाठविण्यात आले. अप्पर तहसीलदारांनी सखोल चौकशी करून संबंधित कागदपत्रे भूमी अभिलेख विभागाकडे पडताळणीसाठी पाठविली. भूमी अभिलेख विभागाच्या तपासणीत सदर कागदपत्रे बनावट व बोगस असल्याचे निष्पन्न झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, ५ जून २०२६ रोजी एका दैनिकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तातून या प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर बाबासाहेब हरगुडे यांनी अरुण गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला. त्यावेळी गायकवाड यांनी घेतलेली संपूर्ण रक्कम परत करण्याचे आश्वासन दिल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. मात्र त्यानंतर त्यांचा मोबाईल क्रमांक बंद असून त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

हरगुडे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, विश्वास संपादन करून बनावट कागदपत्रांच्या आधारे आर्थिक फसवणूक करण्यात आली. वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे एकूण ३५ लाख रुपये देण्यात आले असून उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर देण्याचे ठरले होते.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेअंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, खोटी कागदपत्रे वापरणे तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी तक्रारदाराने वाघोली पोलिसांकडे केली आहे. तसेच फसवणुकीने घेतलेली रक्कम परत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे बिगर शेती परवाना प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या कागदपत्रांच्या पडताळणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून पोलिस तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवणेत भव्य रक्तदान शिबिर संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून श्रीमंत अष्टविनायक मित्र मंडळ, शिवणे यांच्या वतीने एनडीए रोडवरील नवभारत स्कूल, शिवणे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवशंक राजदंडाचे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेट देत आयोजकांचे कौतुक केले आणि रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते अतुल  दांगट (पाटील) यांनी केले होते. यावेळी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक काकासाहेब चव्हाण, माजी नगरसेविका धनश्रीताई कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार खडकवासला विधानसभा अध्यक्ष संदीपदादा पाटील,उद्योजक तुकारामतात्या इंगळे, भाजप नेते अरुण दांगट ,दत्तात्रय कोल्हे, अतुल दांगट पाटील तसेच परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदान हेच श्रेष्ठदान असल्याचे सांगत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सेवाभाव, जनजागृती आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत असल्याचे मत व्यक्त केले.




### कौशल्य शिक्षण चळवळीचा दोन दशकांचा प्रवास उलगडणार

- ‘लेंड अ हॅण्ड इंडिया’तर्फे पुण्यात मंगळवारी (ता. ९) विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन; सुनंदा माने, राज गिल्डा यांची पत्रकार परिषदेत माहिती

पुणे (आरंभ पर्व) : विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यात कौशल्ये, आत्मविश्वास आणि करिअरविषयक स्पष्टता निर्माण करण्यासाठी गेली दोन दशके कार्यरत असलेल्या ‘लेंड अ हॅण्ड इंडिया’ (लाही) या संस्थेच्या कार्याचा गौरव सोहळा मंगळवारी (ता. ९)  सायंकाळी ५.३० वाजता पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. या गौरव सोहळ्यास महाराष्ट्राचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि उद्योजक प्रतापराव पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमातून संस्थेच्या २० वर्षांच्या कौशल्य शिक्षण चळवळीचा प्रवास आणि त्याचा लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर झालेला परिणाम उलगडला जाणार असल्याची माहिती संस्थेच्या संस्थापक सुनंदा माने आणि राज गिल्डा यांनी पत्रकार परिषदेत दिली.




### विद्यापीठे, उद्योग आणि संशोधन संस्थांमध्ये भागीदारीची गरज : राज्यपाल

पुणे (आरंभ पर्व) : "उच्च आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता असून, केवळ पदवीधर नव्हे, तर भावी संशोधक, उद्योजक आणि राष्ट्रनिर्माते घडविण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर आहे. यासाठी विद्यापीठे, उद्योग आणि विविध आर्थिक मंचांमध्ये सखोल सहकार्य आणि भागीदारीची गरज आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. हिंदू इकॉनॉमिक फोरम (एचईएफ) पुणे डिस्ट्रिक्ट चॅप्टरच्या वतीने आयोजित पहिल्या ‘शक्ती समिट २०२६’, उद्योजकता परिषदेचा समारोप राज्यपाल वर्मा यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी लेफ्ट. जनरल (निवृत्त) अजयकुमार सिंग, क्विन्टेसेंशियल फ्रॅग्रन्स प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष भरत कामठे, ॲक्युरेट ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक किरण जाधव, हिंदू इकॉनॉमिक फोरमचे अध्यक्ष गौरव त्रिपाठी, संकेत खरपुडे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाचे सदस्य दीपक करंजीकर, भारत फोर्जचे राजेंद्रसिंग भाटिया यांच्या हस्ते समिटचे उद्घाटन झाले.

### भेसळयुक्त माल जप्त; अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

पुणे (आरंभ पर्व) : ‘सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र’ या मोहिमेंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने पुणे आणि सातारा जिल्ह्यात छापे टाकले. त्यामध्ये भेसळयुक्त पनीर, खवा, तूप आणि अन्य अन्नपदार्थांचा साठा जप्त केला. गेल्या काही दिवसांपासून केवळ पुणे जिल्ह्यातच नाही तर राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाने दाढीचे सत्र सुरू केले आहे. याद्वारे मोठ्या प्रमाणावर नमुने गोळा करण्यात येत असून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात येत आहेत. अन्न औषध प्रशासन विभागाकडे गेल्या काही महिन्यांपासून भेसळीच्या तक्रारी येत होत्या त्याची दखल घेत प्रशासनाने पावले उचलली आहेत. पुण्यात सोमवार पेठ, बुधवार पेठ, शुक्रवार पेठ, कोथरूड आणि हडपसर परिसरातील १७ पनीर व खवाविक्रेत्यांवर प्रशासनाने एकाच वेळी धाडसत्र राबवले. या कारवाईदरम्यान ३५ नमुने विश्लेषणासाठी गोळा करण्यात आले. तसेच, खरेदीची बिले नसलेला आणि अस्वच्छ वातावरणात साठवलेला सुमारे ४७ लाख ३६ हजार १८ रुपयांचा साठा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, अहवाल आल्यानंतर संबंधित आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाई सहआयुक्त दि. वा. भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विभागातील अधिकाऱ्यांच्या पथकाने केली. सातारा जिल्ह्यातील माण आणि कराड तालुक्यांतही तूप, फरसाण व शेवविक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

# ७१ वर्षीय माऊलीला मिळाले जीवनदान

- डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या न्यूरोसर्जरी टीमची कौतुकास्पद कामगिरी

**पुणे-अमोल उदमले**
**(दै. आरंभ पर्व)**

"आई" हा प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार असतो. याच माऊलीच्या डोक्यावर आलेले गंभीर संकट पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील सुपर स्पेशालिटी रुग्णालय आणि संशोधन केंद्रातील न्यूरोसर्जरी विभागाच्या डॉक्टरांनी आपल्या अथांग कौशल्याने परतावून लावले आहे. न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख (HOD) प्रोफेसर डॉ. आशिष चुघ यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७१ वर्षीय ज्येष्ठ माऊलीवर अत्यंत गुंतागुंतीची आणि यशस्वी मेंदूची शस्त्रक्रिया (Neuro-Surgery) करून त्यांना नवे आयुष्य दिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ७१ वर्षीय रुग्ण श्रीमती गयाबाई गोरख उदमले यांना मेंदूच्या गंभीर आजारामुळे अत्यंत आणीबाणीच्या आणि चिंताजनक अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णाचे वय ७१ वर्षे पूर्ण असल्याने आणि मेंदूची शस्त्रक्रिया अत्यंत क्लिष्ट व संवेदनशील असल्याने वैद्यकीय पथकासमोर प्रत्येक सेकंद महत्त्वाचा होता.




**उदमले यांनी मानले डॉक्टरांचे आभार**

सदर रुग्ण श्रीमती गयाबाई गोरख उदमले या ज्येष्ठ पत्रकार अमोल गोरख उदमले यांच्या मातोश्री आहेत. आईंच्या यशस्वी उपचाराबद्दल अत्यंत भावनिक होऊन कृतज्ञता व्यक्त रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक आणि न्यूरोसर्जरी विभागाच्या या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मात्र, न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. आशिष चुघ यांनी तातडीने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत आपल्या विभागातील वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमला सक्रिय केले आणि या कठीण शस्त्रक्रियेचे आव्हान यशस्वीपणे पेलले.

तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाचे सामूहिक कौशल्य आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान

या अत्यंत नाजूक शस्त्रक्रियेमध्ये न्यूरोसर्जरी विभागातील प्रोफेसर डॉ. सारंग शिरीष गोटेचा, प्रोफेसर डॉ. प्रशांत पुनिया आणि एसोसिएट प्रोफेसर डॉ. इशांत शेखर रेगे या वरिष्ठ डॉक्टरांच्या पथकाने आपले संपूर्ण वैद्यकीय कौशल्य पणाला लावले.७१ व्या वर्षी अशा प्रकारच्या क्लिष्ट शस्त्रक्रियेनंतर माऊलींच्या प्रकृतीत झालेली सुधारणा ही या संपूर्ण टीमच्या सामूहिक कष्टांचे आणि अनुभवाचे गोड फळ आहे.

श्रीमती गयाबाई उदमले यांच्यावरील ही संपूर्ण गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आणि उपचार केंद्र सरकारच्या 'आयुष्मान भारत / महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने' अंतर्गत पूर्ण करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून गरिबांमधील गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांनाही डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयासारख्या अत्याधुनिक सुविधायुक्त ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचार मिळणे शक्य होत आहे, हाच या योजनेचा मुख्य उद्देश या उपचारादरम्यान दिसून आला.

**शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतरचा काळ रुग्णासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. डॉ. आशिष चुघ, डॉ. सारंग गोटेचा, डॉ. प्रशांत पुनिया आणि डॉ. इशांत रेगे यांच्या मार्गदर्शनाखालील न्यूरोसर्जरी टीम मध्ये डॉक्टर अझर झोजवाला, डॉक्टर मलिक अर्जुन यासह सपूर्ण निरो सर्जरी डॉक्टर टीम आयसीयू (ICU) व वॉर्डमधील ड्युटी डॉक्टर्स, फिजियोथेरपिस्ट आणि नर्सिंग स्टाफच्या पथकाने अहोरात्र मेहनत घेऊन रुग्णावर बारीक लक्ष ठेवले. नुकतेच रुग्णाचे टाके सुरक्षितपणे काढण्यात आले असून, त्यांची प्रकृती आता वेगाने सुधारत आहे. रुग्णाला फिजिओथेरपीद्वारे पुन्हा पूर्णपणे पूर्वपदावर आणण्यासाठी डॉक्टरांची टीम सातत्याने प्रयत्न करत आहे.**

## ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक जागेतील अतिक्रमण हटवा

- अन्यथा जलसमाधी आंदोलन
- नागेश चव्हाण यांचा प्रशासनाला इशारा



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील ज्योतिबावाडी (जवळगाव नं. २) येथील ग्रामपंचायत हद्दीमध्ये सार्वजनिक जागांवर मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश अभिमन्यू चव्हाण यांनी प्रशासनाकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ग्रामपंचायत प्रशासनाला दिलेल्या निवेदनात गावातील रस्ते, एस.टी. स्टँड परिसर, भाजी मंडई, खेळाचे मैदान, मंदिर परिसर तसेच गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याची मागणी करण्यात आली आहे.

चव्हाण यांनी निवेदनात म्हटले आहे की, अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. पावसाळ्यात नाल्यांमध्ये टाकण्यात आलेला कचरा, दगड आणि झाडांच्या फांद्यांमुळे पाण्याचा निचरा होत नसल्याने पावसाचे पाणी घरांमध्ये शिरण्याचा धोका वाढला आहे. तसेच धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांनाही अडचणी निर्माण होत आहेत.

ग्रामपंचायत प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना या बाबींची माहिती असूनही अतिक्रमणाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नागेश चव्हाण यांनी तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

एक जुलै ते 15 जुलै  या कालावधीत उजनी धरण परिसरात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

"सार्वजनिक हितासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई करावी," अशी मागणी नागेश चव्हाण यांनी केली.

## गर्भलिंग निदानावर धडक कारवाई, दौंड तालुक्यात डॉक्टरांची तपासणी पथके

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील दौंड तालुक्यात बेकायदा गर्भलिंग निदान रॅकेट उघडकीस आल्यानंतर जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येम्पल्ले यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांची १४ पथके तयार करण्यात आली आहेत. तालुक्यात शुक्रवारपासून धडक तपासणी सुरू झाली असून, त्यात एका खासगी रुग्णालयात काही गैरप्रकार आढळून आले. पहिल्या टप्प्यात दौंडमध्ये कारवाई सुरू असून, यानंतर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात ही धडक मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती डॉ. येम्पल्ले यांनी दिली. डॉक्टरांच्या पथकामध्ये क्ष-किरणतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, परिचारिका आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एका पथकाने दौंडमधील एका खासगी रुग्णालयाची तपासणी केली असता, बार्शी, करमाळा आणि आळंदी या भागातून आलेल्या महिलांनी गर्भपात केल्याचे आढळून आले. या रुग्णालयाला परवानगी नसताना या ठिकाणी शस्त्रक्रिया झाल्या असून, आरोग्य विभागाकडून या रुग्णालयावर कारवाई करण्यात येणार आहे.

## वसुंधरा संवर्धन रथाचे उद्घाटन; ५००० वृक्षरोपांचे वाटप संकल्प

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था, जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणे (GPA) तसेच पुणे सिंहगड रोड डॉक्टर्स असोसिएशन (PSRDA) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘वसुंधरा संवर्धन रथ’ या विशेष उपक्रमाचे उद्घाटन खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर आणि पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या हस्ते करण्यात आले.



सिंहगड रोड परिसरातील गृहनिर्माण सोसायट्या, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांपर्यंत देशी प्रजातींची वृक्षरोपे पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत ५००० देशी वृक्षरोपांचे मोफत वाटप करण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती उपक्रमाचे प्रमुख आयोजक आणि संस्थापक अध्यक्ष नगरसेवक हरिदास चरवड यांनी दिली.

पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रवाढ आणि जैवविविधतेचे जतन या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे विविध सोसायट्या व सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन वृक्षरोपांचे वितरण करण्यात येणार आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. यावेळी GPA चे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब काकडे, PSRDA च्या अध्यक्षा डॉ. राजश्री काकडे, ज्येष्ठ माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, जयश्री भूमकर, संदीप बेलदरे, युवराज बेलदरे, सारंग नवले, विशाल उभे, उपआयुक्त विजयकुमार वाघमोडे, आरोग्य निरीक्षक संदीप खराडे, कुणाल मते, मुकादम अशोक साठे यांच्यासह विविध सामाजिक व पर्यावरणप्रेमी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# संयम, संघर्ष आणि पक्षनिष्ठेचे फलित

## राजाभाऊ राऊत यांची विधान परिषदेकडे दमदार वाटचाल

**(दै. आरंभ पर्व)**

**"पराभव हा शेवट नसतो; तो नव्या विजयाची सुरुवात असतो. संयम, जिद्द आणि पक्षनिष्ठा जपली तर यश नक्की मिळते."**


बार्शी तालुक्याच्या राजकारणात गेल्या दोन दशकांत स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण करणारे राजाभाऊ राऊत आज विधान परिषदेच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. शिवसेनेच्या शाखाप्रमुख पदापासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास अनेक चढ-उतार, संघर्ष, यश-अपयश आणि जनसंपर्काच्या बळावर घडलेला आहे. भारतीय जनता पक्षाने त्यांना विधान परिषदेची उमेदवारी देत त्यांच्या राजकीय कारकिर्दीची आणि पक्षनिष्ठेची दखल घेतली आहे.




राजकारणात अनेक जण संधीच्या शोधात पक्ष बदलतात, भूमिका बदलतात; मात्र राजाभाऊ राऊत यांनी वेळप्रसंगी आक्रमक भूमिका घेतली असली तरी संयम, सातत्य आणि संघटनबांधणीचा मार्ग कधीही सोडला नाही. अपक्ष आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिला. सत्तेच्या समीकरणांमुळे भाजपला विरोधी पक्षात बसावे लागले, तरीही त्यांनी विरोधी बाकांवर राहून पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली.

त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. मराठा आरक्षण आंदोलनाच्या राजकीय परिणामांचाही त्यांना फटका बसला. अनेकांच्या राजकीय कारकिर्दीला अशा पराभवानंतर खीळ बसते; मात्र राऊत यांनी पराभवाला संधी मानत जनतेशी संपर्क कायम ठेवला. विकासकामे, संघटनबांधणी आणि कार्यकर्त्यांशी असलेली नाळ अधिक मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाशी असलेल्या सुसंवादाचा उपयोग त्यांनी बार्शी तालुक्याच्या विकासासाठी करून घेतला. हजारो कोटी रुपयांचा विकास निधी आणत रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा आणि विविध विकासकामांना गती दिली. त्यामुळे पराभवानंतरही जनतेच्या मनातील त्यांचे स्थान कायम राहिले.

राजकीयदृष्ट्या पाहिले तर बार्शी बाजार समितीपासून स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत अनेक निवडणुकांमध्ये त्यांनी रणनीती, संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांच्या बळावर विजय मिळवला. अनेकदा अशक्य वाटणारी राजकीय गणिते त्यांनी आपल्या गनिमी काव्याच्या शैलीत जुळवून दाखवली. बार्शी बाजार समितीवरील वर्चस्व असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील यश, या प्रत्येक टप्प्यावर त्यांचे नेतृत्व अधिक बळकट होत गेले.




तालुक्यातील गट-तटांचे राजकारण संपुष्टात आणून शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वाचा पैलू मानला जातो. या भूमिकेमुळे काही राजकीय नुकसान सहन करावे लागले, परंतु त्यांनी वैयक्तिक फायद्यापेक्षा तालुक्याच्या हिताला प्राधान्य दिले. त्यामुळे पराभवानंतरही जनतेचा विश्वास त्यांच्यावर कायम राहिला.

सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यासाठी आणि विविध पक्षांतील प्रभावी नेत्यांना भाजपमध्ये आणण्यासाठीही राऊत यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे ते केवळ बार्शीपुरते मर्यादित राहिले नाहीत, तर जिल्हास्तरावरील प्रभावी नेतृत्व म्हणून उदयास आले.

याच सर्व राजकीय प्रवासाची दखल घेत भारतीय जनता पक्षाने त्यांच्यावर विधान परिषदेच्या उमेदवारीची जबाबदारी सोपवली आहे. महायुतीकडे असलेले संख्याबळ आणि राजकीय गणिते पाहता त्यांच्या विजयाची केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अनेक पक्षांतील नेत्यांशी असलेले त्यांचे मैत्रीपूर्ण संबंधही त्यांच्या विजयाची शक्यता अधिक बळकट करत आहेत. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानताना राऊत यांनी पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि संयम यांचे महत्त्व अधोरेखित केले. "यश आणि अपयश हे राजकारणाचा भाग आहेत. मात्र जिद्द, प्रामाणिक काम आणि जनतेचा विश्वास कायम ठेवला तर यश निश्चित मिळते," असे त्यांनी नमूद केले.

आज विधान परिषदेकडे वाटचाल करणारे राजाभाऊ राऊत हे बार्शीच्या राजकारणातील एक महत्त्वाचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. संघर्षातून घडलेले हे नेतृत्व आता जिल्ह्याच्या आणि राज्याच्या राजकारणात आणखी मोठी भूमिका बजावणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्याचबरोबर भविष्यात बार्शी विधानसभा मतदारसंघात युवा नेतृत्व म्हणून रणवीर राऊत यांची भूमिका काय असेल, याबाबतही राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

राजकारणात संयम, पक्षनिष्ठा आणि विकासाची दृष्टी असेल तर पराभवही यशाचा मार्ग बनू शकतो, हे राजाभाऊ राऊत यांच्या प्रवासाने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे.

## 'हिंदू इकॉनॉमिक फोरम पुणेच्या 'शक्ती समिट २०२६' मध्ये

# ५०० दशलक्ष डॉलर्सचा एआय रोडमॅप जाहीर

### कोट्यवधींचे सामंजस्य करार आणि स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'विकसित भारत २०४७' च्या दिशेने देशाच्या घोडदौडीला गती देत, 'हिंदू इकॉनॉमिक फोरम'च्या (एचईएफ) पुणे शाखेतर्फे आयोजित 'शक्ती समिट २०२६' चा पुणे आंतरराष्ट्रीय केंद्रात यशस्वी समारोप झाला. ही उच्चस्तरीय परिषद भारताच्या धोरणात्मक शक्ती आराखड्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले आहे.

यामध्ये धोरणात्मक संरक्षण आणि एरोस्पेस, हिंदू मंदिर अर्थव्यवस्था, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ज्ञान आणि प्रसारमाध्यमे ), तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा या मुख्य क्षेत्रांचा प्रामुख्याने समावेश होता.या परिषदेने आपल्या बहुआयामी उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता केली. यामध्ये प्रामुख्याने स्वदेशी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ला भक्कम आधार देणे, देशांतर्गत व्हेंचर कॅपिटलचा मार्ग मोकळा करणे आणि महत्त्वपूर्ण संरक्षण व आर्थिक व्यवस्थेमध्ये धोरणात्मक आत्मनिर्भरतेला बळ देणे या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.




महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहून विशेष मार्गदर्शन केले. भारताचा दीर्घकालीन विकास आणि धोरणात्मक आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या क्षेत्रांमध्ये सरकार, उद्योग जगत, गुंतवणूकदार आणि शैक्षणिक-संशोधन संस्था यांच्यात अधिक भक्कम समन्वय व सहकार्य असण्याच्या गरजेवर त्यांनी आपल्या भाषणात विशेष भर दिला. राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी नमूद केले की, 'शक्ती समिट २०२६' हे एका आत्मविश्वासी, आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर सक्षम भारताच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करते. बदलती भू-राजकीय परिस्थिती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानामुळे उद्योगांना मिळणारे नवीन स्वरूप पाहता, भारताकडे नाविन्यपूर्ण संशोधन, उद्योजकता आणि धोरणात्मक भागीदारीच्या माध्यमातून विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपले स्थान बळकट करण्याची मोठी संधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्योग जगत, शैक्षणिक संस्था, गुंतवणूकदार, स्टार्टअप्स आणि एमएसएमई यांच्यात अधिक जवळचे संबंध असण्याच्या गरजेवर भर देताना राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्रात आणि विशेषतः पुण्यात भारताच्या विकासाच्या पुढील टप्प्याला गती देण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक ताकद उपलब्ध आहे. 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न केवळ सर्वसमावेशक, शाश्वत आणि समाजातील प्रत्येक घटकाला फायदेशीर ठरेल अशा विकासाच्या माध्यमातूनच पूर्ण केले जाऊ शकते, असेही त्यांनी शेवटी जोडले.




एचईएफ पुणे जिल्हा शाखेचे अध्यक्ष आणि 'पार्टेक्स.एआय'चे सह-संस्थापक व सीटीओ गौरव त्रिपाठी म्हणाले की, 'शक्ती समिट २०२६' मुळे आर्थिक विकासाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनात मोठा बदल झाला आहे. आम्ही आता अशा एका 'एक्झिक्युशन-फर्स्ट' (अमलबजावणीला प्राधान्य देणाऱ्या) व्यवस्थेची निर्मिती करत आहोत, जिथे मोठा भांडवलशाही निधी, धोरणात्मक औद्योगिक क्षेत्रे आणि सांस्कृतिक-सभ्यताविषयक स्पष्टता यांचा मिलाफ होत आहे.

ते पुढे म्हणाले की, 'पुणे एआय ग्रीड' हे येथील उत्पादन आणि डिजिटल क्षमतेचा विस्तार करून पुण्याला भारताची 'अप्लाईड एआय' आणि धोरणात्मक राजधानी म्हणून प्रस्थापित करत आहे. आमचे सखोल संशोधन कौशल्य, मजबूत औद्योगिक पाया आणि पायाभूत सुविधा यांची सांगड घालून आम्ही 'आत्मनिर्भर भारत' सारख्या राष्ट्रीय प्राधान्यक्रमांना ठोस आर्थिक टप्प्यांमध्ये रूपांतरित करत आहोत.

पुण्याला 'अप्लाईड एआय'ची जागतिक राजधानी म्हणून प्रस्थापित करण्यासाठी 'पार्टेक्स. एआय'ने एक सर्वसमावेशक आराखडा सादर केला. यामध्ये पहिल्या टप्प्यात ५० दशलक्ष डॉलर्सच्या निधीसह 'डिस्ट्रिब्युटेड जीपीयू क्लस्टर्स' आणि 'एआय मॉडेल फाउंड्री'ची उभारणी केली जाईल. त्यानंतर या प्रकल्पाचा विस्तार ५०० दशलक्ष डॉलर्सपर्यंत (अंदाजे ४,१५० कोटी रुपये) केला जाणार असून, याद्वारे १ लाख व्यावसायिकांना प्रशिक्षित करण्याचे आणि संरक्षण, उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) तसेच आरोग्य क्षेत्रासाठी निर्यातक्षम तंत्रज्ञान विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.


'पार्टेक्स.एआय'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गुंजन भारद्वाज म्हणाले की, 'पुणे एआय व्हिजन' ही जागतिक स्तरावर मोजक्याच शहरांना जमेल अशा मोठ्या प्रमाणावर नाविन्यपूर्ण संशोधन आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्याची एक उत्तम संधी आहे. पुण्यातील प्रतिभावंतांना एका व्यासपीठावर आणून आम्ही अशा एका निर्णयक्षम तंत्रज्ञानाची निर्मिती करू शकतो, जे केवळ भारतीय उद्योगांनाच नव्हे, तर संपूर्ण जगाला एक नवी दिशा देईल. संरक्षण, उत्पादन आणि लाईफ सायन्सेस क्षेत्रातील संशोधनाला गती देण्यासाठी आमचे एआय-आधारित व्यासपीठांचे कौशल्य पणाला लावून या महत्त्वाकांक्षी आराखड्यात भागीदार होण्यासाठी 'पार्टेक्स' कटिबद्ध आहे.

या परिषदेत महत्त्वाच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या असून, मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी आणि गुंतवणूक योजनांचे अनावरण करण्यात आले. ही गुंतवणूक प्रामुख्याने एआय इन्फ्रास्ट्रक्चर , सागरी स्वायत्तता आणि स्टार्टअप इकोसिस्टमचा विकास यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांना गती देण्यासाठी केली जाणार आहे.

'ॲक्युरेट इंडस्ट्रियल कंट्रोल्स' या कंपनीतर्फे भारताचे पहिले पूर्णपणे स्वदेशी बनावटीचे 'ऑटोनॉमस सरफेस व्हेईकल' 'इसाका' प्रदर्शित करण्यात आले. भारतीय नौदलाकडून घेण्यात आलेल्या विविध चाचण्यांमध्ये यशस्वी ठरलेल्या 'इसाका'मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सेन्सर फ्युजन आणि स्वदेशी 'कोलिजन-अव्हॉइडन्स' (अपघात टाळणारे) सॉफ्टवेअर या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मिलाफ साधण्यात आला आहे. भारताच्या सागरी स्वायत्तता क्षेत्रातील हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

'ॲक्युरेट ग्रुप'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. किरण जाधव म्हणाले की, "स्वदेशी स्वायत्त जलवाहन तंत्रज्ञान हे भारताची क्षमता आणि आमचा 'आत्मनिर्भरते'चा दृढ संकल्प दर्शवते. या 'शक्ती समिट'च्या माध्यमातून आम्ही अशा नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनात्मक उपायांसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे, जे आपल्या देशाचे संरक्षण आणि सागरी सामर्थ्य अधिक मजबूत करण्यासाठी उपयुक्त ठरतील." महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर धोरणात्मक चर्चा हे या परिषदेचे मुख्य आकर्षण ठरले. यामध्ये संरक्षण, एरोस्पेस, दुर्मिळ खनिजे , पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, मंदिर अर्थव्यवस्था, एआय आणि स्टार्टअप्स या विषयांवर विविध क्षेत्रांतील उद्योगपती, संस्थापक आणि तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. या धोरणात्मक चर्चेतून ठोस परिणाम हाती यावेत यासाठी, 'एचईएफ पुणे जिल्हा शाखे'ने एका संरक्षण कार्यगट स्थापनेची घोषणा केली. परिषदेनंतरही यावर पद्धतशीरपणे पुढील काम सुरू ठेवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचाच हा एक भाग आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### निरा-मोरगाव रस्त्यावर अपघातात अल्पवयीन बहिणींचा मृत्यू

निरा (आरंभ पर्व) : निरा-मोरगाव रस्त्यावरील चौधरवाडी फाटा येथे टेम्पो आणि मोपेड यांच्यात समोरासमोर झालेल्या अपघातात दोन अल्पवयीन बहिणींचा जागीच मृत्यू, तर त्यांचा नऊ वर्षांचा भाऊ गंभीर जखमी झाला. शनिवारी दुपारी साडेचारच्या सुमारास ही दुर्घटना घडली. अक्षदा ज्ञानेश्वर बोडरे (वय १७) आणि तिची बहीण सेजल (वय १५, रा. मुरूम, ता. फलटण, जि. सातारा) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा भाऊ पवन (वय ९) हा जखमी झाला असून, त्याला बारामतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. टेम्पो चालकाला ताब्यात घेण्यात आल्याचे वडगाव निंबाळकर पोलिसांनी सांगितले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदत केली. या अपघातामुळे काही काळ निरा-मोरगाव मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास वडगाव निंबाळकर पोलीस करत आहेत.

### दोन लाखांची लाच घेताना वायरमन एसीबीच्या जाळ्यात

पुणे (आरंभ पर्व) : नवीन वीजमीटर जोडणीसाठी ठेकेदाराकडून दोन लाख रुपयांची लाच घेताना महावितरणमधील वायरमनला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. देहू गावात ही कारवाई झाली. गजानन बाळासाहेब चट्टे (वय ३५, सध्या रा. मिडास रिजन्सी, देहू



बायपास रस्ता, ता. खेड, जि. पुणे, मूळ रा. हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका ठेकेदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे शासकीय ठेकेदार आहेत. खेड तालुक्यातील येलवाडी गावात एका महिलेने एक गुंठा जमीन खरेदी केली होती. आरोपी चट्टे हा येलवाडी महावितरण कार्यालयात वायरमन आहे. महिलेने ठेकेदारामार्फत नवीन वीजमीटर बसविण्यासाठी ठेकेदारामार्फत महावितरणकडे ऑनलाइन अर्ज केला होता. त्यानंतर चट्टे हा ठेकेदाराला भेटला. या भागात ११ गुंठे जमीन आहे. येथे वीजमीटर बसविण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच ठेकेदाराकडे मागितली होती. ठेकेदाराने याबाबत तक्रार दिली. तक्रारीची पडताळणीनंतर देहू गावातील भैरवनाथ चौकात सापळा लावण्यात आला. तक्रारदार ठेकेदाराकडून ११ मीटर बसविण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच घेणाऱ्या चट्टे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा लावून पकडले. चट्टे याला अटक करण्यात आली. पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील आणि पथकाने ही कारवाई केली. सहायक आयुक्त भारती मोरे तपास करत आहेत.

## आळंदी-तुळापूर रस्त्यावरील बंगल्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांची धाड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आळंदी-तुळापूर रस्त्यावरील तुळापूर गावाच्या हद्दीतील एका आलिशान बंगल्यात सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी रविवारी मध्यरात्री छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत मद्यधुंद अवस्थेतील काही तरुणींसह अनेक जणांना ताब्यात घेण्यात आले असून घटनास्थळावरून नशेसाठी वापरले जाणारे विविध पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास लोणीकंद पोलीस करत आहेत. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तुळापूर गावाच्या हद्दीतील एका बंगल्यात मोठ्या आवाजात संगीत सुरू असून तेथे तरुण-तरुणींची पार्टी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने मध्यरात्री अचानक छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच काही जणांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी परिसराला वेढा घालून अनेकांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान काही तरुणी मद्याच्या आणि अन्य अमली पदार्थांच्या नशेत असल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळावरून नशेसाठी वापरले जाणारे संशयित पदार्थ, मद्याच्या बाटल्या तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले असून ते तपासासाठी पाठविण्यात आले आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या व्यक्तींची ओळख पटविण्याचे काम सुरू असून संबंधित बंगला नेमका कोणाच्या मालकीचा आहे, पार्टीचे आयोजन कोणी केले होते आणि त्यामागे अमली पदार्थांचे रॅकेट कार्यरत आहे का, याचाही शोध पोलीस घेत आहेत.

## थेऊर, नायगाव व हिंगणगाव कृषी फिडरवरील गावांना पुन्हा दिवसा वीजपुरवठा सुरू करा : सभापती युवराज काकडे

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील थेऊर, नायगाव व हिंगणगाव (एजी) कृषी फिडरअंतर्गत येणाऱ्या सर्व गावांना पूर्वीप्रमाणे दिवसा वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे मुळशी विभागाचे कार्यकारी अभियंता देविदास बैकर तसेच आमदार ज्ञानेश्वर कटके यांना निवेदन सादर केले.

सध्या या फिडरअंतर्गत येणाऱ्या गावांमधील शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा केला जात असल्याने सिंचन व्यवस्थापनात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. रात्रीच्या वेळी शेतात जाऊन विद्युत मोटारी सुरू करणे, पाण्याचे नियोजन करणे यामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून रात्रीच्या वेळी शेतीची कामे करताना जीवितास धोका निर्माण होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय महिलांनाही रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी या भागातील गावांना दिवसा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे आणि सिंचनाचे नियोजन सुलभपणे करता येत होते. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून पेरणीपूर्व कामांसाठी दिवसा वीजपुरवठा होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सभापती युवराज काकडे यांनी म्हटले आहे. म्हणून थेऊर, नायगाव व हिंगणगाव एजी फिडरअखत्यारीतील सर्व गावांना पूर्ववत दिवसा वीजपुरवठा सुरू करण्यासाठी महावितरण प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# पुण्यात आनंदवन आणि युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या वतीने ७०० वृक्षांचे रोपण

- शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून २०२६ रोजी युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम आणि आनंदवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हडपसर-महंमदवाडी परिसरातील आनंदवन फेज-५ (औताडवाडी-हांडेवाडी) तसेच न्याती काउंटी येथे भव्य वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. सकाळी ७ ते ११ या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमात विविध शाळांतील विद्यार्थी, निसर्गप्रेमी नागरिक आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र वन विभागाचे फॉरेस्ट कॉन्झर्व्हेटर आशिष ठाकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, झपाट्याने वाढणारे शहरीकरण आणि जागतिक तापमानवाढ या गंभीर आव्हानांना तोंड देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि लोकसहभाग अत्यावश्यक आहे.

सध्या जगभरात भेडसावणारी ग्लोबल वॉर्मिंगची समस्या, वाढते तापमान आणि दुर्मिळ होत चाललेल्या वनौषधींचे अस्तित्व यांचा विचार करून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी सुमारे ७०० वृक्षांची लागवड करण्यात आली असून केवळ वृक्षारोपण न करता पुढील तीन वर्षे या वृक्षांचे संगोपन व संवर्धन केले जाणार असल्याची माहिती युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचे अध्यक्ष डॉ. विक्रम गायकवाड यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान आनंदवन संस्थेचे विशाल पवार यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत आनंदवन फेज-१ ते फेज-७ पर्यंत झालेल्या विस्ताराची माहिती दिली. तसेच युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या डॉ. सोनल भालेराव यांनी संस्थेच्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, संस्था गेली तीन वर्षे कळसुबाईच्या पायथ्याशी वृक्षारोपण आणि संवर्धनाचे कार्य करत असून त्याच उपक्रमाचा विस्तार म्हणून यावर्षी आनंदवन फेज-५ येथे ही मोहीम राबविण्यात आली आहे.

हा कार्यक्रम केवळ जागतिक पर्यावरण दिनाचा औपचारिक सोहळा नसून समाजहितासाठी राबविण्यात येणारी लोकचळवळ असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी आनंदवन संस्थेचे प्रवीणकुमार आनंद, रमेश नऱ्यानी, भूपेश शर्मा तसेच युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचे डॉ. समीर ननावरे, डॉ. पुस्तके, डॉ. पाटील, डॉ. वाळके आदी उपस्थित होते. इंडियन डायस्पोराचे रजत कुमार आणि झेंटिव्हाचे पुरोहित यांच्यासह दिल्ली पब्लिक स्कूल, अमानोरा स्कूल, रेहान स्कूल, डीपीएस स्कूल आणि ग्रेस स्कूलच्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

याशिवाय नोबेल हॉस्पिटलचे मुख्य अधिकारी डॉ. संजय पठारे, हेल्थ केअर असोसिएशनचे धनंजय कणसे, सिद्धू चव्हाण, हृषीकेश शेळके, डॉ. भूषण केदारी, श्री. अडसूळ, संघर्ष अकॅडमी (उरुळी कांचन) व वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी तसेच शेकडो पर्यावरणप्रेमी नागरिक या हरित मोहिमेत सहभागी झाले होते.

## लिफ्टमध्ये अडकलेल्या पेपर विक्रेत्याची अग्निशमन दलाने केली सुटका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पहाटे स. ५.१५ ची वेळ. नेहमीप्रमाणे पेपर टाकण्यासाठी मंडई परिसरातील एका इमारतीचे त्यांनी लिफ्टचे बटन दाबले, लिफ्ट सुरू झाली, पण डकमध्येच लिफ्ट बंद पडली. त्यात मोबाईलचा रिचार्ज संपल्याने कुणाशी संपर्कही होईना. त्यांनी अनेक हाका मारल्या, पण त्यांना ना कुणाचा प्रतिसाद मिळाला ना मदत. अखेरचा प्रयत्न म्हणून त्यांनी १०१ डायल केला अन् लगेच अग्निशमनचे जवान आले अन् तब्बल पाऊण तासानंतर त्यांची लिफ्टमधून सुटका झाली. ही आपबिती अनुभवली पेपर विक्रेते सागर धाडवे यांच्यावर. जिवावर बेतणाऱ्या प्रसंगातून सुटका केल्याबद्दल अग्निशमन दलाचे त्यांनी आभारही मानले.



आपल्या जिवावर बेतणाऱ्या अनुभवाविषयी सांगताना धाडवे म्हणाले, की घरोघरी जाऊन पेपर वितरित करण्याचे माझे काम सकाळी भल्यापहाटेपासूनच सुरू होते. शनिवारी (दि. ६) पहाटे मंडई परिसरातील लक्ष्मी नारायण इमारतीत नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रांची चळत घेऊन निघालो होतो. लिफ्टने वरच्या मजल्यावर जात असताना अचानक पहिल्या अन् दुसऱ्या मजल्याच्या मधोमध डकमध्येच लिफ्ट बंद पडली. मदतीसाठी कुणाला बोलावे म्हणून मोबाईल लावून पाहतो, तर रिचार्ज संपल्याने कुणाशी संपर्कच होईना. अखेर इमारतीतील कुणी मदतीला येईल, यासाठी दारावर अनेक थापा मारल्या, आवाज देऊन पाहिला, पण सर्वच साखर झोपेत असल्याने कुणापर्यंतही ती हाक गेली नाही. जवळपास पाऊण तास आतमध्येच अडकून होतो. काय करावे काहीच सूचत नव्हते. थोडा वेळ शांत बसलो अन् १०१ नंबर डायल केला. नंबर डायल झाल्यानंतर तिकडून लगेच प्रतिसाद मिळाला. त्यांना मी अडकल्याचे सांगितले आणि त्वरीत मदत करण्याचे आवाहन केले. थोड्याच वेळात कसबा अग्निशमन दलाचे जवान देवदूतासारखे धावून आले. प्रभारी अधिकारी कमलेश चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अवघ्या ४ मिनिटांत माझी सुटका केली. घामाघूम अवस्थेत मी त्यांचे आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.